REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास', पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २३ मार्च, १९३८ अंक १२

हंस चित्र ज्वाला

पत्नी हीं पुण्याच्या मार्गावरील ज्योति आहे पण पापाच्या मार्गा-वर—त्या मार्गावर याच ज्योतीची ज्वाला होते

ज्वाला
पुरी भडकली

प्रलय! प्रलय कधीच झाला आहे! बाहेर माणसं मुंग्यासारखीं चिरडली जात आहेत. मान वर करून बघणाऱ्यांच्या डोळ्यांच्या खांचा होत आहेत; कोंवळ्या पोरींच्या कपाळचं कुंकू पुसलं जात आहे; तुरुंग भराभर भरत आहेत! राजवाड्यांत मुळुमुळु रडत बसणाऱ्याला तो प्रलय कोठून दिसणार!—

—वि. स. खांडेकर

भूमिका :
चंद्रमोहन
रत्नप्रभा
आशालता
विनायक
मांडरे
रजनी
ढवळे
इ. इ. इ.

लेखक : वि. स. खांडेकर
दिग्दर्शक : विनायक
छाया चित्रण : पांडुरंग नाईक
रेकॉर्डिंग : चिंतामणराव मोडक
पटकथा लेखक व संकलक : र. शं. जुन्नरकर
कला : पळणिटकर
संगीत : खांसाहेब घम्मनखां

मार्मिक संवाद – मधुर संगीत – भव्य देखावे – अभिजात अभिनय

अप-टु-डेट शिलाई करतां
महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशां-साठी भोजनाचें व उतर-ण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक-पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

विविध माहिती

रस्तेसुधराईकरितां चार कोटि रु.

मुंबई प्रांतांतील रस्तेसुधराईकरितां येत्या सात वर्षांत चार कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत.

अकौंटंटसची नोंदणी.

हिंदी अकौंटंटसच्या नोंदणीपटावर आतां ६४५ अकौंटंटांचीं नांवें आहेत. १३० अकौंटंटांकडे २७२ आर्टिकल्ड क्लार्क शिक्षण घेत आहेत. उमेदवारांस शिक्षण देण्याचा अधिकार १० संस्थांस आहे. १९३७ सालीं अखेरच्या परीक्षेस बसलेल्या १८४ उमेदवारांपैकीं १९ पास झाले.

जर्मनीमधील मोटार-गाड्या

जर्मनीमधील प्रमुख रस्ते मोटारींची जलद वहातुक सहन करतील अशा रीतीनें बांधण्यांत आलेले असल्याकारणानें त्या देशांत तयार होणाऱ्या मोटार-गाड्या ज्यास्त वेग घेऊं शकतील अशा रीतीनें बनविल्या जात आहेत. परदेशी गाड्यांची स्पर्धा जर्मन गाड्यांशीं होत नाहीं. बर्लिन येथील मोटार शोमध्यें फोर्ड गाड्या ठेवण्यांत आल्या आहेत, परंतु त्या जर्मन बनावटीच्या आहेत. ब्रिटिश गाड्यांपैकीं फक्त ऑस्टिन गाड्या तेथें मांडल्या आहेत.

निर्गत व्यापारास आडकाठी

इटली व जर्मनी ह्या देशांकडे माल निर्गत करतेवेळीं,त्या देशांतील हुंडणावळीच्या नियंत्रणामुळें हिंदी व्यापाऱ्यांस अडचण होत असल्याची तक्रार हिंदुस्थान सरकारकडे आली असल्याचें मि. डाड यांनीं असेंब्लींत सांगितलें.

ब्रिटिश तरुणांस ऑस्ट्रेलियांत निमंत्रण

ऑस्ट्रेलिया देशांत परदेशीयांची भरती होत आहे. तीस आळा बसावा ह्यासाठी ग्रेटब्रिटनमधून दरसाल सात हजार तरुणास ऑस्ट्रेलियांत आणवून स्थायी करावें, असा तेथील सरकारचा विचार आहे. येण्याचा खर्च ब्रिटिश व ऑस्ट्रेलियन सरकारांनीं समप्रमाणांत वांटून घ्यावा, अशी योजना आहे.

प्रो. काळे ह्यांचें परराष्ट्रीय हुंडणावळीवर व्याख्यान

इंडिअन इंस्टिटयूट ऑफ बँकर्स (पुणें शाखा) च्या विद्यमानें "परराष्ट्रीय हुंडणावळ" ह्या विषयावर आज सत्रासहा वाजतां प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान होणार आहे.

"थँक्स"

वक्ते आभार मानावयास उभे राहिले. पांच मिनिटांपेक्षा अधिक वेळ न घेण्याची सूचना त्यांस अध्यक्षांनीं केली. पंधरावीस मिनिटांनीं भाषणास रंग चढला आणि श्रोते कंटाळून गेले. वक्ते म्हणाले: "मी स्वतःच्या व तुमच्या सर्वांच्याच वतीनें बोलत नसून भावी पिढीच्या वतीनेंहि भाषण करीत आहें!" हें ऐकून श्रोतृवर्गांतून आवाज निघाला:- "हं! लवकर आटोपतें घ्या. नाहींतर तुमचें भाषण संपण्यापूर्वींच पुढच्या पिढ्या येथें येऊन उभ्या रहावयाच्या!"

राष्ट्रसंघाचा हिंदी श्रोत्यांकरितां रेडिओ कार्यक्रम

हिंदी श्रोत्यांसाठी जिनीव्हा येथून राष्ट्रसंघामार्फत ब्रॉडकास्टिंग करण्यांत येणार आहे. त्यास प्रारंभ ता. ३ एप्रिल,१९३८, रोजीं होईल. रविवारीं सकाळीं ९-१५ वाजतां हा कार्यक्रम ठेवला जाईल.

हातानें बनविलेला दौलताबादी कागद

मुंबई प्रांतांत कागदाचे चार कारखाने आहेत, परंतु रंधा तयार करणारा एकहि कारखाना नाहीं. पुणें व अहमदाबाद जिल्ह्यांत हातानें कागद बनविला जातो व सुमारें १०० लोक ह्या व्यवसायावर आपलें पोट भरतात. मुंबई सरकारास लागणाऱ्या हातानें बनविलेल्या कागदापैकी बराच कागद दौलताबादेहून येतो.

ट्रेझरी बिलांवर १ रु. ९ आ. ८ पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु.-९ आ. ८ पै. इतका पडला.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या हिंदुस्थानांतील शाखेनें गेल्या वर्षीं १६५ पुस्तकें प्रसिद्ध केलीं, त्यांपैकी १८ पुस्तकें इंग्लंडमध्यें छापलेलीं होतीं.

बँक ऑफ इटलीचा सुवर्णसंचय

बँक ऑफ इटलीच्या सुवर्ण-संचयांत गेल्या १२ महिन्यांत कांहीं घट झाली नाहीं असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. पण या बातमींत विशेष काय आहे?

ग्रेटब्रिटनमधील रेडिओचें उत्पादन व मिळकत

१९३७ अखेर ग्रेटब्रिटनमध्यें एकूण ८४ लक्ष ८० हजार रेडिओ लायसेन्सदार होते; १९३६ अखेर ही संख्या ७९ लक्ष ६१ हजार इतकी होती. म्हणजे गेल्या वर्षी दरमहा ४३,२६८ रेडिओंची भर पडत होती. त्या देशांतील रेडिओ व त्यांचे सुटे भाग ह्यांच्या वार्षिक उत्पादनाची किंमत सुमारें ३२ कोटि रु. भरते व ह्या धंद्यांत ५० हजार लोकांस काम मिळत आहे.

मोटारींची फेर-नोंदणी

मुंबई प्रांतांतील मोटारींच्या नोंदणीचें वर्ष मार्च, १९३८ अखेर संपतें. रजिस्ट्रेशन फी १५ एप्रिलचे आंत भरून मोटारींची फेर-नोंदणी करून घेतली पाहिजे.

साखरेचें उत्पादन

१५ फेब्रुवारी, १९३८ अखेरच्या पंधरवड्यांत, हिंदी साखर कारखान्यांपाशीं ७१½ लक्ष मण साखरेचा साठा होता. ह्या पंधरवड्यांत २५½ लक्ष मण साखरेचें उत्पादन झालें व ११¾ लक्ष मण साखर विक्रीकरितां कारखान्यांतून बाहेर गेली. पंधरवड्याअखेर ८५¼ लक्ष मण साखर शिल्लक आहे. वरील आकडे हिंदुस्थानांतील १४५ साखर कारखान्यांपैकीं १०१ कारखान्यांबाबतचे आहेत.

जुन्या दिल्ली शहराची सुधारणा

जुन्या दिल्ली शहराचे सुधारणेकरितां हिंदुस्थान सरकारनें एक योजना आखली असून तिचेसाठीं ९८ लक्ष रु. मंजूर केले आहेत. हें काम दिल्ली इंप्रूव्हमेंट ट्रस्ट मार्फत करविण्यांत येईल. ट्रस्टला रकम कर्जाऊ देण्यांत येईल व हें कर्ज ट्रस्ट हप्त्या-हप्त्यानें फेडील.

हिंदी चहाचा खप वाढविण्यासाठी प्रचार

१९३८-३९ सालांत चहाचे प्रसाराकरितां हिंदुस्थानांत प्रचार करण्यासाठीं इंडियन टी मार्केट एक्सपॅन्शन बोर्डानें १८ लक्ष रु. मंजूर केले आहेत. परदेशांतील प्रचाराकरितां २२½ लक्ष रु. खर्चण्यांत यावयाचे आहेत ते वेगळे.

मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

	रु. किंमत
६-३-३८ ते १२-३-३८	१५,९४,३७६
१३-३-३८ ते १९-३-३८	९,८३,०९५
२१-९-३१ ते १९-३-३८	३,११,९९,२९,३७६

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	१३४	७ गहाणदार व घरमालक	१३९
२ ब्रिटिश बँकिंगचें गेलें वर्ष	१३५	८ मुंबई प्रांतांतील कपास कापडाच्या गिरण्या...	१४०
३ रोख्यांच्या किंमती व व्याजाचे दर ...	१३६	९ लोखंड-पोलादाचें वाढतें उत्पादन	१४०
४ स्फुट विचार... ... युद्धाची भीति आणि लढाऊ खर्च-अवाढव्य लढाऊ खर्च-शिंबनपासणीच्या धंद्याचें महत्त्व.	१३७	१० अहमदाबाद येथील गिरण्यांचें भवितव्य ...	१४१
५ मोटारवहातुकीचें नियंत्रण...	१३८	११ नाशिक जिल्हा सहकारी वृत्त	१४२
६ मुंबईच्या रोखेबाजाराच्या व्यवस्थेंत सुधारणा...	१३९	१२ डिस्नेच्या कार्टूनची फिल्म	१४२
		१३ निवडक बाजारभाव	१४३

अर्थ

बुधवार, ता. २३ मार्च, १९३८

ब्रिटिश बँकिंगचें गेलें वर्ष

ग्रेटब्रिटनमधील व्यापारी बँकांच्या भोंवतालची आर्थिक व सामाजिक स्थिति आणि त्यांची व्यवहारपद्धति विशिष्ट प्रकारची असल्यानें हिंदुस्थानांतील संयुक्त भांडवली बँकांचें व त्यांचें साम्य नाहीं असें म्हणतां आलें तरी तिकडच्या घडामोडींच्या अनुभवाचा फायदा ह्या देशांतील बँकांस घेतां येणार नाहीं असें नाहीं. आधुनिक हिंदी बँकांचा कारभार ब्रिटिश व्यापारी बँकांच्या नमुन्याचाच आहे आणि ह्या देशांत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्थापन झाल्यापासून इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांतील बँकांच्या व्यवहारांत वाढतें साम्य निर्माण होत आहे. ह्या दृष्टीनें पहातां, गेलें वर्ष ब्रिटिश बँकांस कसें गेलें ह्याची माहिती उपयुक्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. बँक ऑफ इंग्लंड व ब्रिटिश व्यापारी बँका ह्यांचे परस्पर-संबंध, त्या बँकांचा द्यावयाच्या कर्जाचा व फाजील पैसा सरकारी रोख्यांत गुंतवण्याचा प्रघात, गिऱ्हाइकांच्या ठेवी व रोकड शिल्लक ह्यांचें एकमेकांशीं प्रमाण इत्यादि बाबतींत अनेक पिढ्यांच्या अनुभवानें विशिष्ट रीतीची घडी बसून गेलेली आहे. हिंदुस्थानांतील प्रथितयश बँकांच्या व्यवहारांची वाढ ह्याच धर्तीवर होत आलेली आहे आणि पुढें होणार आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां बँकिंगशीं संबंध असलेल्या आमच्या वाचकांस ब्रिटिश बँकांच्या १९३७ सालांतल्या व्यवहारांविषयींची खालीं दिलेली माहिती उद्बोधक वाटेल अशी आम्हांस खात्री वाटते.

गेल्या वर्षी ग्रेटब्रिटनमध्यें मंदीस आळा बसून उद्योगधंदे व व्यापार ह्यांची चलती होती. ह्या कारणानें बँकांच्या व्यवहारांस उत्तेजन मिळून त्यांचा बराच विस्तार झाला. कागदी चलन साडेतीन कोटि पौंडांनीं अधिक झालें, ह्याचा अर्थ, खेळत्या पैशाचा पुरवठा वाढला. ह्या गोष्टीचा परिणाम बँकांच्या रोकड शिलकांवर झाला असता. परंतु मध्यवर्ती बँकेनें सोनें व सरकारी रोखे खरेदी करून खेळतें चलन मर्यादित केलें. बँकांच्या जवळील गिऱ्हाइकांच्या ठेवींत विशेष वाढ झाली नाहीं आणि व्यापाराच्या चलतीमुळें कर्जाविषयीं मागणी ज्यास्त आली. अशा स्थितींत जवळचे रोखे विकून व ट्रेझरी बिलसची मुदत संपतांच त्यांची रोकड जमा करून बँकांनीं ती नड भागवली. व्यापाराची चलती होती ह्याचें निदर्शक म्हणून, गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जाचें एकूण ठेवींशीं प्रमाण डिसेंबर, १९३७ मध्यें अकरा प्रमुख ब्रिटिश बँकांत ४२ टक्के होतें आणि हेंच प्रमाण पूर्वीच्या सालीं सुमारें ३८½ टक्के होतें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तसेंच, कर्जरोख्यांत गुंतवलेल्या पैशाचें एकूण ठेवींशीं असलेलें साप्ताहिक प्रमाण पूर्वसालाच्या मानानें थोडें कमी झालें ही गोष्टहि चलतीची द्योतक आहे. बँकांच्या ताळेबंदांतील जिंदगी व देणें ह्या सदरांतल्या निरनिराळ्या बाबींच्या परस्पर-प्रमाणांत फेरबदल एका बाजूनें झाला आणि दुसऱ्या बाजूनें ठेवींवर द्यावयाच्या व्याजाच्या रकमेंत बचत झाली, ह्यामुळें त्यांच्या निवळ नफ्याचें प्रमाण सहाजिकपणेंच वाढलें. व्यापाराच्या चलतींत मुदतीच्या ठेवींच्या मानानें चालू खात्यावरील रकमा अधिक होण्याची स्वाभाविक प्रवृत्ति असते आणि ह्या रकमांवरील व्याजाचा दर अल्प असतो. म्हणजे, अधिक व्याज देणारीं कर्जे वाढलीं आणि कमी व्याजाच्या ठेवीहि वाढल्या आणि ह्याचा परिणाम असा झाला कीं खर्चापेक्षा मिळकत जास्त होऊन बँकांचा नफा फुगला.

बँकांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण असें घडलें कीं मंदीच्या काळांत न येण्यासारखीं व संशयित म्हणून काढून टाकलेलीं कर्जे व्यापाराच्या चलतीच्या योगानें येण्याच्या सदरांत येऊन पडलीं. प्राप्तीवरील वाढलेला कर आणि नवीन बसवण्यांत आलेल्या जादा कराचा बोजा हीं वजा जाऊनहि बँकांस समाधानकारक नफा उरला ह्याचें श्रेय वर वर्णिलेल्या, बदललेल्या व सुधारलेल्या परिस्थितीस दिलें पाहिजे हें स्पष्ट होण्यासारखें आहे. संशयित कर्जाची वेळोवेळ भरपूर तरतूद करणें, प्रसंगीं उपयोगी पडावे म्हणून निरनिराळे निधि बाजूस काढून ठेवणें इत्यादि प्रकारांच्या सावधगिरीच्या योजना वर्षानुवर्ष नियमानें अमलांत आणल्यानें ब्रिटिश बँकांस स्थैर्य व मजबुती विलक्षण रीतीनें प्राप्त झालेली आहे. ह्या कारणानें त्यांच्या वार्षिक नफ्याच्या वांटणींत सातत्य दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांनीं दिलेलें डिव्हिडंड मोठें दिसतें आणि तें त्यांस दरवर्षी सारखें देतां येतें ही गोष्ट डोळ्यांत भरते. परंतु तिच्या मागें बँकांच्या चालकांचें वर निर्दिष्ट केलेलें सावधगिरीचें व दूरदर्शीपणाचें धोरण असतें हें विसरून चालतां कामा नये. लंडनमधल्या अकरा प्रमुख बँकांच्या व्यवहारांचे गेल्या दोन सालांबाबतचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून ह्या लेखांतलीं प्रमुख विधानें स्पष्ट होतील:—

(१)

लडन येथील अकरा प्रमुख बँकांचे आकडे

(आकडे कोटि पौंडांचे आहेत)

वर्ष (मासिक सरासरी)	ठेवी	रोकड	कर्जें	रोखे	डिस्कौंट केलेलीं बिल्स
१९३६	२२१½	२२¼	८६½	६४¼	३२
१९३७	२२८¾	२३½	९५½	६५¼	२८
१९३८ जाने.	२३३	२४½	९८	६३½	३३

(२)

रोकड, कर्जें, रोखे इत्यादींचें ठेवींशीं प्रमाण

(ठेवींच्या किती टक्के)

वर्ष (मासिक सरासरी)	रोकड	कर्जें	रोखे	डिस्कौंट केलेलीं बिल्स
१९३६	१०·३	३९·०	२९·०	१४·४
१९३७	१०·३	४१·७	२८·५	१३·३
१९३८ जाने.	१०·८	४१·५	२७·३	१४·२

रोख्यांच्या किंमती व व्याजाचे दर

प्रो. केन्स ह्यांचा अभिप्राय

युरोपांतलें राजकीय वातावरण एकाएकीं प्रक्षुब्ध होऊन ब्रिटिश राजकारणावर जर्मनीच्या ऑस्ट्रिअन धोरणाचा तात्काल परिणाम झाला. देशाबाहेरील व देशांतील महत्त्वाच्या राजकीय व आर्थिक घडामोडींचें उष्णतामापक यंत्र रोखे बाजारांतील किंमतींचें कोष्टक हें होय. गेल्या आठवड्यांत ह्या किंमतींत थोडीफार चलबिचल झाली. देशांतील उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांस लागणारें लांब व अल्प मुदतींचें भांडवल बेताच्या दरानें उपलब्ध होणें आवश्यक असतें आणि राष्ट्रीय सरकाराच्या गरजा व पैशाचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालत असल्यानें त्याच्या सांपत्तिक धोरणाचा निकट संबंध रोखे बाजारांतील घडामोडींशीं येत असतो. राष्ट्रीय सरकार आणि मध्यवर्ती बँक ह्यांच्या हातांत पैशाचीं सूत्रें असतात असें म्हणावयास हरकत नाहीं. पैशाच्या पुरवठ्याचा विस्तार किंवा आकुंचन करणें, अल्प मुदतीचीं किंवा लांब मुदतीचीं कर्जें काढणें, सोन्याची खरेदी–विक्री करणें, परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दराचें नियमन करणें इत्यादि मार्गांनीं चाललेल्या व्यवहारांचा परिणाम रोखे व भाग ह्यांचे बाजारभाव, व्याजाचे दर व एकंदर आर्थिक परिस्थिति ह्यांवर होत असतो. सरकार व मध्यवर्ती बँक ह्यांच्या शक्तीच्या बाहेर असलेल्या कारणांच्या योगानें वरील प्रकारचे परिणाम घडून येणें शक्य आहे आणि ते घडतातहि. तथापि, त्यासंबंधांतहि योग्य नियमन करणें सरकारास व राष्ट्रीय बँकेस शक्य व आवश्यक असतें. आर्थिक मंदीस आळा बसून चलतीचें चक्र चालू रहावें ह्या हेतूनें लांब व मध्यम मुदतींचे व्याजाचे दर हलके रहातील अशी व्यवस्था सरकारनें करावी ह्या अर्थाची सूचना प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. केन्स हे गेलीं कांहीं वर्षें करीत आले आहेत. नॅशनल म्यूच्युअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटीचे ते अध्यक्ष असून त्या संस्थेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं त्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांस विशेष महत्व देण्यांत येत असतें. त्यांचें विवेचन "अर्था"मध्यें आम्हीं दरवर्षी करीत असतों. यंदाच्या भाषणांतील मुख्य मुद्यांचा परामर्श येथें थोडक्यांत घेण्याचें योजलें आहे.

परदेशांतून इंग्लंडमध्यें येणाऱ्या तात्पुरत्या ठेवींचा पैसा, सोन्याची खरेदी, सरकारनें तिच्यासाठी विकलेले रोखे इत्यादि बाबींवर प्रो. केन्स यांचा कटाक्ष असल्यानें त्यांच्या तपशिलांत शिरण्याचें कारण नाहीं. सर्वसाधारण स्वरुपाचा त्यांच्या भाषणांतला ठळक मुद्दा काय होता हें येथें सांगावयाचें आहे. आर्थिक चलतीची प्रगति कुंठित होऊन धंदे–व्यापाराचीं चक्रें पुन्हां मंदावतात कीं काय अशी भीति कित्येकांस वाटत आहे, ती निराधार आहे असाच प्रो. केन्स ह्यांचा अभिप्राय दिसतो. मध्यम व दीर्घ मुदतीच्या व्याजाचे दर वाढणें आणि सरकारी व स्थिर व्याजाचे इतर रोखे ह्यांच्या किंमती उतरणें, आर्थिक दृष्टीनें श्रेयस्कर नसल्यानें सरकारच्या तिजोरीचें धोरण त्या बाबतींत निश्चयात्मक आणि विधायक रहावें असें त्यांचें सांगणें आहे. फ्रान्ससारख्या बाहेरच्या देशांत राजकीय अस्वस्थता उत्पन्न झाली कीं तेथील लोक सुरक्षितपणासाठीं आपला पैसा ठेव म्हणून इंग्लंडमध्यें पाठवतात. तो सोन्याच्या स्वरूपांत आला असतां सरकारास सोनें विकत घ्यावें लागतें आणि त्याच्या मोबदला ट्रेझरी बिल्स व अल्प मुदतींचे इतर रोखे विकण्यांत येतात. ह्याचा परिणाम सरकारी व स्थिर व्याजाच्या दराचे रोखे ह्यांच्या किंमती उतरण्यांत होतो. व्यवहारांत खेळणाऱ्या पैशाचा पुरवठाहि वरील कारणास्तव मर्यादित होतो. गेल्या वर्षी अशा तऱ्हेच्या उलाढाली झाल्याचें प्रो. केन्स ह्यांनीं आकडे देऊन सिद्ध करण्याचा प्रयत्न आपल्या भाषणांत केला. त्यांचे आकडे व त्यांवरून काढलेलीं अनुमानें तपशिलाच्या दृष्टीनें तज्ञ टीकाकारांस मान्य नाहींत. तथापि, खेळत्या भांडवलाचा पुरवठा, प्रचलित व्याजाचे दर, रोख्यांचे बाजार भाव व सरकारी तिजोरीचें धोरण ह्यांचे संबंधांत प्रो. केन्स ह्यांनीं व्यक्त केलेले विचार स्थूल मानानें त्यांस अमान्य नाहींत. तज्ञ टीकाकारांनीं त्यांस पाठिंबा दिला आहे.

दुकानांतील कामगारांच्या कामाच्या तासांस मर्यादा

मुंबई सरकारचें बिल

दुकानांत काम करणाऱ्या कामगारांच्या कामाचे तास मर्यादित करण्याकरितां मुंबई सरकारनें बिलाचा एक आराखडा तयार केला आहे. गिरण्यांतील कामगारांकरितां ज्याप्रमाणें फॅक्टरी ॲक्ट आहे, त्याचप्रमाणें दुकानांतील कामगारांसाठी प्रस्तुतची तरतूद आहे. सबंद प्रांताकरितां जरी हा कायदा करण्यांत येणार असला, तरी प्रथम त्याची अंमलबजावणी मुंबई, अहमदाबाद, पुणें व सोलापूर ह्या चार शहरांत व्हावयाची आहे. दुकानें, कचेऱ्या, केशकर्तनालयें, हॉटेलें, थिएटरें, सिनेमागृहें व इतर करमणुकीच्या जागा ह्यांत काम करणारे लोक प्रस्तुत कायद्याचे कक्षेंत येतील. कोणत्याहि कामगारास दिवसांतून विश्रांतीकरितां व जेवणाकरितां सुट्टी वगळून नऊ तासांपेक्षां जास्त काम पडूं नये व आठवड्यांतून जास्तींत जास्त ५४ तास काम करावें लागावें अशी योजना आहे. नाताळ, दिवाळी इत्यादी पूर्वीच्या आठवड्यांस वरील नियम लागू पडणार नाहीं. प्रत्येक कामगारास जेवण व विश्रांति ह्यांसाठी रोज एक तास सुट्टी व वर्षांतून ५२ पगारी सुट्या मिळाल्याच पाहिजेत, अशी तजवीज कायद्यानें केली जाईल. १२ वर्षांखालील मुलांस ह्यापुढें नेमतां येणार नाहीं, परंतु सध्या नोकरींत असलेलीं मुलें, तीं शारीरिकदृष्ट्या लायक ठरल्यास, कामावरून काढून टाकण्याचें कारण नाहीं. १५ वर्षांखालील मुलांस सकाळीं ६ पूर्वी व रात्रीं ७ नंतर कामास लावतां येणार नाहीं. मुलांच्या कामाचे तासहि कायद्यानें मर्यादित केले जातील.

शिपोशी को. क्रेडिट सोसायटीची ज्युबिली

शिपोशी को.-क्रे. सोसायटीची रौप्य ज्युबिली ता. १३ मार्च रोजीं शिपोशी येथें साजरी झाली.

स्फुट विचार

युद्धाची भीति आणि लढाऊ खर्च

युद्धाच्या भीतीमुळें लढाऊ खर्च राष्ट्रें वाढवीत आहेत आणि लढाऊ खर्च वाढत चालल्यामुळें युद्धाची भीति वाढत आहे अशी आज जगाची स्थिति होऊन गेली आहे. युद्धाची जय्यत तयारी असली, म्हणजे शत्रु आपणांवर शस्त्र उगारण्यास धजणार नाहीं ह्या समजुतीनें राष्ट्रें लढाऊ खर्च अधिकाधिक करीत आहेत आणि ह्याप्रमाणें दंड थोपटून उभीं राहिलेलीं राष्ट्रें एकमेकांवर केव्हां घसरतील ह्याचा नियम कोणी सांगावा? लढाऊ तयारीवर खर्च होणें म्हणजे आर्थिक सुस्थितीच्या व्यवहारांत व्यत्यय येणें होय. सरकारचा लष्करी खर्च वाढला म्हणजे जनतेवरील करांचा बोजा वाढतो, राष्ट्रीय कर्जें फुगतात आणि व्यापारास व उद्योगधंद्यांस लागणाऱ्या शांततेचा आणि परस्पर-विश्वासाचा अभाव सामान्य जनतेच्या रहाणीस बाधक होतो. प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणें, कोणत्याहि राष्ट्रानें दुसऱ्याची आगळीक केली असतां इतर सर्व राष्ट्रांनीं जुटीनें त्याचा समाचार घेणें आणि परस्पर-सहायानें जागतिक शांतता कायम राखणें हीं महायुद्धाचे अखेर मान्य झालेलीं ध्येयें व उद्दिष्टें जगांतलीं प्रमुख राष्ट्रें विसरून गेलीं आहेत. युद्ध ही मानवी आपत्ति आहे आणि लढाऊ खर्च हें उधळेपणाचें लक्षण आहे ह्या तत्त्वाचें त्यांस विस्मरण झालेलें आहे. युद्ध-सामग्रीचा खर्च कोणत्या प्रमाणावर आज चालला आहे ह्या विषयींचे कांहीं आंकडे येथें दिले असतां त्याच्या विनाशक अवाढव्यपणाची कल्पना येईल. पस्तीस हजार टन वजनाचें एक लढाऊ जहाज बांधण्यास सुमारें ११ कोटि रुपये खर्च येतो. जपानच्या चढाईच्या धोरणामुळें पाश्चात्य राष्ट्रें बेचाळीस हजार टनांचीं जहाजें बांधण्याच्या विचारांत असून असल्या प्रत्येक जहाजास १५ कोटि रुपयांचे वर खर्च येईल. असलीं प्रचंड लढाऊ जहाजें बांधण्यांत राष्ट्रांची परस्पर-स्पर्धा चालू झाली म्हणजे लष्करी खर्च कोणत्या थरास जाईल ह्याची कल्पना करवत नाहीं. लढाऊ खर्चाचा बोजा जनतेस असह्य होऊं लागला आणि ती असंतुष्ट होऊं लागली म्हणजे इटली, जर्मनी वगैरे सारख्या राष्ट्रांतले सत्ताधीश परदेशांशीं कांहीं तरी कुरापत काढून युद्ध पुकारतात आणि लोकांच्या असंतोषाचें परिमार्जन करूं पहातात. चढेलखोरपणाचीं व अन्यायाचीं युद्धें ह्या रीतीनें जगांत माजतात आणि त्यांचे परिणाम सर्व मानवी जातीस भोगावे लागतात.

अवाढव्य लढाऊ खर्च

राष्ट्रसंघ हतबल ठरून युरोपांत आंतरराष्ट्रीय लढे सामोपचारानें मिटत नाहींत असें दिसून येतांच ग्रेटब्रिटन व फ्रान्स ह्या देशांत लढाऊ तयारीचा खर्च तात्काळ वाढवण्याचें धोरण तेथील सरकारांस अंगिकारावें लागलें आहे. ह्या प्रीत्यर्थ इंग्लंडचा दररोजचा खर्च सुमारें सवा कोटि रुपये होत आहे. १९३७ मध्यें ब्रिटिश सरकारच्या एकूण खर्चांतला २८टक्के इतका खर्च लढाऊ स्वरुपाचा होता. रशियन सरकारच्या एकूण खर्चाशी लष्करी खर्चाचें प्रमाण ३५ टक्के होतें. फ्रान्समध्यें ४० टक्के, जपानमध्यें ४६ टक्के (चिनी युद्धाचा खर्च वगळून) आणि पोलंडमध्यें ५७टक्के ह्या प्रमाणें हें प्रमाण बसलें. सर्व जगाचा मिळून लढाऊ खर्च सुवर्ण चलनांत मोजला असतां, १९१३ मध्यें सुमारें १,००० कोटी रुपये होता; १९३३ सालीं हा आकडा १,९०० कोटींच्या घरांत गेला. पुढें दोन वर्षांनीं, म्हणजे १९३५ मध्यें, जागतिक लढाऊ खर्च अजमासें २,४०० कोटि रुपये झाला आणि गेल्या वर्षी त्याची वाढ २,९०० कोटींच्या वर गेली. ह्या प्रमाणें जागतिक लढाऊ खर्चाची कमान सारखी चढत आहे आणि त्यानें कमाल मर्यादा गाठली आहे असें अजून म्हणतां येत नाहीं. जगांत एकूण लोकसंख्या २०० कोटि आहे आणि रक्षण व युद्धाची तयारी ह्यांचे प्रीत्यर्थ दरवर्षी दर माणशी सुमारें १५ रुपये खर्च होत आहेत असें वरील आकड्यांवरून दिसून येईल. बरें, इतका खर्च होत असून जगांत स्वस्थता तर नाहींच, पण शांतता-भंगाचीच भीति सदैव व सर्वत्र वाटत आहे. आम्हांला युद्ध नको, शांतता पाहिजे, असें प्रत्येक राष्ट्रांतले सत्ताधारी पुन्हां, पुन्हां कंठरवानें सांगत असतां लढाऊ खर्च कमी न होतां कां वाढत जावा? आंतरराष्ट्रीय मतभेद नाहींसे करण्याचा शांततामय मार्ग आतां उरला नाहीं, असें समजावयाचें कीं काय?

हिशेब-तपासणीच्या धंद्याचें महत्त्व

अनुभवी, जबाबदार, कर्तव्यदक्ष व सरळवृत्तीच्या हिशेब-तपासनिसांचें व्यापारांत व उद्योगधंद्यांत किती महत्त्व आहे ह्याची जाणीव जितकी दृढ व विस्तृत होईल तितकें हितावह आहे. धंदेव्यापाराची घटना दिवसानुदिवस बदलत चालली आहे आणि लक्षावधि लोकांचें भांडवल त्यांत गुंतत आहे. त्यांच्या हिताच्या संरक्षणासाठीं व व्यवहाराच्या चोखपणासाठीं हिशेब व्यवस्थित ठेवले जाणें आणि त्यांची तपासणी चौकसपणानें होणें अगत्याचें आहे ह्याविषयीं दुमत होण्याचें कारण नाहीं. सर हॅरोल्ड बेलमन ह्यांनीं इंग्लंडमध्यें इन्कॉर्पोरेटेड अकौंटंट्सना उद्देशून नुकतेंच भाषण केलें, त्यांत ह्याच्या पुढें जाऊन हिशेब तपासनिसांवर सामाजिक व सार्वजनिक महत्त्वाची विशेष जबाबदारी त्यांनीं टाकली, तिकडे लक्ष वेधणें जरूर आहे. धंद्याच्या काटेकोरपणानें पाहिलें असतां हिशेबनिसांचें कार्य मर्यादित असून व्यापार व कारखाने ह्यांच्या आर्थिक व सामाजिक परिणामांविषयींची जबाबदारी त्यांच्या शिरावर नसते. पण सर हॅरोल्ड ह्यांच्या मतें संयुक्त भांडवलाच्या मोठमोठ्या मंडळ्यांचा फैलाव होत असतां असंख्य लहान भागीदारांच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्याचें काम त्यांच्या कर्तव्य-कक्षेंत येऊन पडतें. मंडळ्यांची पुनर्घटना, मालाच्या खरेदी-विक्रीच्या योजना इत्यादि बाबतींत उत्पादक व उपभोक्ते ह्यांच्या हिताशीं त्यांचा निकट संबंध येतो. अर्थात् ह्या विषयींची विशेष जबाबदारी हिशेबनिसांवर टाकणें उचित होणार नाहीं. तथापि, आधुनिक पद्धतीच्या आर्थिक व्यवहारांत त्यांचा सल्ला महत्त्वाचा गणला जात असल्यानें आपल्या धंद्यांतल्या मंडळींचें धोरण स्वकर्तव्य-प्रवण आणि उच्च दर्जाचें राहील अशी खबरदारी त्यांनीं जुटीनें व सर्वानुमतें घेणें आवश्यक आहे, ह्या सर हॅरोल्ड बेलमन यांच्या विधानास सहज मान्यता मिळण्यासारखी आहे. जमाखर्च, पावत्या, ताळेबंद इत्यादि तपशील बरोबर आहेत कीं नाहीं एवढेंच पहाण्यानें संतुष्ट न होतां त्यांनीं आपली दृष्टी व्यापक केली असतां त्यायोगानें हिशेब-तपासनिसांच्या धंद्याचा दर्जा वाढून समाजहित अधिक साधेल यांत शंका नाहीं.

मोटारवहातुकीचें नियंत्रण

मोटार वेहिकल्स बिलाचा मसुदा

रेल्वे वहातुक व मोटार वहातुक ह्यांची योग्य सांगड कशी घालतां येईल, ह्याविषयीं आज बरींच वर्षे चर्चा चालू आहे. त्या संबंधीं चौकशी करून सूचना करण्याचें काम मोटार वेहिकल्स इन्शुअरन्स कमिटी व वेजवुड कमिटी ह्यांजकडे मध्यवर्ती सरकारनें सोपविलें होतें. सदरहु कमिट्यांच्या शिफारशींस अनुसरून हिंदुस्थान सरकारनें आतां एक बिल तयार केलें आहे. प्रांतिक सरकारांचाहि त्याबाबत सल्ला घेण्यांत आला होता.

प्रस्तुत बिलानें भाड्याच्या वहानांचे चार वर्ग केले आहेत. (१) नियमितपणें भाडें करणाऱ्या बसेस, (२) विशिष्ट कामासाठीं वापरण्यांत येणाऱ्या टॅक्सी व मोटारी (३) माल वहाणाऱ्या खासगी गाड्या व (४) भाड्यानें माल वहाण्याचा धंदा करणाऱ्या गाड्या. ह्या चार प्रकारच्या गाड्यांचें नियंत्रण करण्यासाठीं प्रादेशिक व्यवस्था केली जाईल व जरूर वाटल्यास सबंद प्रांताकरितां एक अधिकारी मंडळ नेमण्यांत येईल. भाड्याच्या वहानांना परवाना देण्यापूर्वी, गाडी सुस्थितींत आहे किंवा नाहीं, वेगाची कमाल मर्यादा ओलांडली जाते किंवा कसे, गाडींत तिच्या ताकदीबाहेर वजन भरलें जातें कीं काय, ड्रायव्हरांस काम किती पडतें, इत्यादि गोष्टींचा विचार केला जाईल.

लोकांच्या गरजा भागवून त्यांच्या सोई करणें, नुकसानकारक स्पर्धेस आळा घालणें व रस्त्यांस अनुरूप अशाच. वाहनांतून वहातुक होईल अशी व्यवस्था करणें, हे तीन मुद्दे मोटार वहातुकीच्या नियंत्रणाचे वेळीं ध्यानांत घेतले जातील. लांब पल्ल्याची वहातुक रेलवेजकडेच रहावी परंतु लहान अंतराकरितां जेथें मोटारी ज्यास्त सोईच्या होतील तेथें त्यांस भाडें करूं द्यावें, असें सरकारचें धोरण आहे.

थर्ड पार्टी इन्शुअरन्सबाबत नियोजित कायद्यानें ग्रेटब्रिटनमधील कायदा नमुन्यादाखल घेतला आहे. ड्रायव्हिंगचा परवाना सबंद हिंदुस्थानांत चालावा, अशी कायद्यांत तरतूद करण्यांत येणार आहे. लायसेन्सवरील अपघाताच्या व गुन्ह्याच्या नोंदींसंबंधींहि योग्य तरतूद केली जावयाची आहे. मोटारींच्या ताकदीबाहेर त्यांवर ओझें लादण्यांत येऊं नये, ह्यासाठीं मोटार कारखानदारांकडूनच प्रत्येक भाड्याच्या मोटारींत किती कमाल वजनाचा माल भरावा, ह्याविषयीं माहिती मागविण्याचा सरकारचा हेतु आहे. अशी माहिती मागविली म्हणजे भरमसाट ओझें भरण्याच्या प्रवृत्तीस आळा बसविणें सोपें जाईल. सर्व वाहनांच्या वेगावरहि प्रभावी नियंत्रण बसविण्याची योजना होणार आहे.

मॅग्नीशियम क्लोराइडला संरक्षण

मॅग्नीशियम क्लोराइडच्या धंद्यास असलेलें संरक्षण चालू ठेवावें किंवा कसें हें ठरविण्याकरितां मध्यवर्ती सरकारनें त्यासंबंधीं चौकशी करण्याचें काम टारिफ बोर्डाकडे सोपविलें आहे. "हिंदुस्थानांत दरसाल १० हजार टन मॅग्नीशियम क्लोराइड तयार होतें. १९३० सालीं ह्या धंद्यास संरक्षण मिळण्यापूर्वी २½ हजार टन इतकें तें देशी कारखान्यांत खपत असे. आतां तें ग्रेटब्रिटन, ऑस्ट्रेलिया, हॉलंड इत्यादि देशांतहि निर्गत होऊं लागलें आहे, परंतु संरक्षण काढून घेतल्यास परदेशी मालाशीं स्पर्धा करणें त्यास कठीण जाईल," अशा आशयाचें पत्र इंडियन मर्चंट्स चेंबरनें टारिफ बोर्डास लिहिलें आहे. मुंबई सरकारनेंहि ह्या धंद्यास संरक्षण आवश्यक आहे, असें बोर्डास लिहून कळविलें आहे.

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
संगीत-मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.

गायन	हार्मोनियम	दिलरुबा	फिडल्
किं. ६ आ.	किं. २॥ रु.	किं. १ रु. २ आ.	किं. १ रु. ४ आ.

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठीं कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६८८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[स्थापना सन १९३५]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

मुंबईच्या रोखेबाजाराच्या व्यवस्थेंत सुधारणा.

मॉरिसन कमिटीच्या शिफारशींची अंमलबजावणी

मुंबई येथील नेटिव्ह शेअर अँन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनच्या कार्यपद्धतीसंबंधानें चौकशी करून रोख्यांत पैसे गुंतविणारांच्या हितांचें संरक्षण नीट व्हावें ह्या दृष्टीनें सूचना करण्याकरितां मुंबई सरकारनें मॉरिसन कमिटी नेमली होती तिनें मार्च १९३७ मध्यें आपला रिपोर्ट सरकारास सादर केला. मुंबईच्या रोखेबाजाराची सदोष व्यवस्था सुधारावी ह्याकरितां सरकारनें मागें ॲटले कमिटी नेमली होती, तथापि तिच्या सूचनांचा फारसा उपयोग झाला नाहीं. रोखेबाजारांतील व्यवहारांस जुगारीचें स्वरूप प्राप्त होऊं नये व चढ-उताराचें मान मर्यादित रहावें ह्या हेतूनें त्यांच्या पद्धतींत सुधारणा करण्यांत आली पाहिजे ह्याविषयीं दुमत नव्हतें. ह्या बाजारांत चालणाऱ्या व्यवहारांत सट्टेबाजीच्या सवद्यांचें प्रमाण सुमारें ८०-९० टक्के पडतें व त्या कारणानें मुंबई इलाख्यास रोखेबाजाराचा अपेक्षित आर्थिक उपयोग होत नाहीं, असा अभिप्राय वर निर्दिष्ट केलेल्या मॉरिसन कमिटीनें स्पष्टपणें नमूद केला. कमिटीच्या शिफारशींचा परामर्श 'अर्था'मध्यें येऊन गेलेलाच आहे. सरकारनें त्यासंबंधानें आपलें मत बनवणें जरूर होतें. सदरहु कमिटीच्या शिफारशींचा विचार करून त्या विषयींचें स्वतःचें धोरण त्यांनीं आतां जाहीर केलें आहे.

कमिटीच्या कांहीं शिफारशी अंमलांत आणण्यास चालू कायद्याची आडकाठी येणार नाहीं; परंतु कांहींच्या बाबतींत "बॉंबे सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्टस कंट्रोल ॲक्ट"त बदल करावा लागेल. (१) मार्जिन्सच्या पद्धतीची सक्ति, (२) कोऱ्या वर्गावर्गीस आळा, (३) असोसिएशनवर नियम लादण्याचा सरकारास अधिकार, (४) कांहीं विशिष्ट परिस्थितींत डायरेक्टर बोर्ड दूर करतां येण्याची तरतूद व (५) तात्काळ रोखे देण्याघेण्यावर सरकारमान्य असोशिएशन्सचा ताबा, ह्या पांच बाबतींत कायद्यामध्यें दुरुस्ती केल्याविना सुधारणा घडवून आणतां येणार नाहीं. ह्यासंबंधीं सरकारचा निर्णय लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल.

ज्या बाबतींत कायद्यामध्यें दुरुस्ती करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाहीं, त्यांविषयीं सरकारनें आपला निर्णय जाहीर केला आहे. बाजाराचा रोजचा व्यवहार बंद करण्याच्या, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या अधिकारावर बंधन घातलें जाऊन सरकारच्या पूर्व संमतीशिवाय बोर्डानें कांहीं बाबतींत तरी बाजाराच्या व्यवहारांत मध्यें पडूं नये असा नियम सरकारी ठरावांत नमूद आहे. नेटिव्ह शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनला हें सरकारी नियमन मान्य नाहीं. तूर्त सरकार असोसिएशनच्या कार्यपद्धतीवर नजर ठेवील व जरूर वाटल्यास आपला नियंत्रणाचा अधिकार बजावील. आपल्या कुवतीच्या बाहेर केलेले करार पाळतां न आल्यास अनेक सभासदांस आपलीं देणीं भागवतां येत नाहींत. अशा लोकांच्या व्यवहारामुळेंच बाजारास सट्टेबाजीचें स्वरूप येतें. देणीं भागवतां न येणाऱ्या सभासदांचें सभासदत्व रद्द करण्याविषयीं कडक योजना सरकारनें सुचविली आहे व ती असोसिएशनलाहि मान्य आहे. दलालांचे दुय्यम म्हणून काम करणारांच्या व्यवहारांवरहि नियंत्रण घालण्यांत येणार आहे. दलालीचा किमान दर निश्चित करण्यांत यावयाचा असून किती मोठ्या व्यवहारावर सवलत दिली जावी हेंहि ठरवून दिलें जाणार आहे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक दरसाल व्हावी, असें ठरलें आहे. बोर्डाची निवडणूक झाल्यानंतर असोसिएशनचा त्यावर अधिकार चालणार नाहीं. असोसिएशनचें सभासदत्व मिळवूं इच्छिणारानें प्रत्येकी १० हजारांचे दोन वर्षे मुदतीचे तीन जामीन दिले पाहिजेत अगर ३० हजार रु. अनामत ठेवले पाहिजेत. वार्षिक फी शंभराची तीनशे रुपये करण्यांत यावी, असा बदल नियमांत करण्यांत यावयाचा आहे. असोसिएशननें पाळावयाच्या सुट्ट्यांचे दिवसहि निश्चित केले आहेत. सरकारी सूचनांस अनुसरून असोसिएशननें सुचविलेल्या दुरुस्त्या सरकारी गॅझिटांत प्रसिद्ध करण्याचें ठरलें आहे. त्यांवर लोकांस आपलें मत प्रदर्शित करण्यास संधि मिळेल.

गहाणदारानें घरमालकास भाडें देण्याचें कारण नाहीं

श्री. नाईक ह्यांच्या मुंबई येथील इमारतींत एक दुकान होतें. घरमालकानें दुकानदारास नोटीस देऊन जागा खाली करण्यास सांगितलें असतां नोटीशीची मुदत भरल्यावरहि भाडेकऱ्यानें जागा सोडली नाहीं. भाडेकऱ्याची चीजवस्तु श्री. भिमजी ह्यांचेकडे गहाण होती. सावकारानें तो माल ताब्यांत घेऊन दुकानास कुलूप ठोकलें व दारावर आपण माल ताब्यांत घेतला असल्याविषयीं पाटी लावली. श्री. नाईक ह्यांनीं गहाणदार सावकारावर नोटीस बजावून जितके दिवस खोली त्याचे ताब्यांत राहील, तितक्या दिवसांचें भाडें पडेल, असें त्यास कळविलें. परंतु नोटिशीस उत्तर मिळालें नाहीं. मूळ भाडेकऱ्यास कोर्टानें नादार ठरविलें व त्याच्या दुकानांतील मालाचा लिलाव झाला. घरमालकानें गहाणदार सावकारावर दावा लावून भाड्याची मागणी केली. दाव्याचा निकाल स्मॉल कॉज कोर्टांत घरमालकाचे बाजूनें झाला परंतु तो अपिलांत फिरला. जंगम मालाचा रिसीव्हर व प्रस्तुत गहाणदार ह्यांची भूमिका एकाच स्वरूपाची आहे व घरमालकास भाडें मागतां येत नाहीं, असें फुल बेंचाचें मत पडलें. भाडेकऱ्यानें आपली जागा घरमालकास जोंपर्यंत खाली करून दिलेली नाहीं, तोंपर्यंत भाडेकरी हाच भाडें देण्यास बांधलेला रहातो; मालकानें त्यास कोर्टामार्फत काढून टाकल्यावांचून भाडेकऱ्याचा जागा स्वतःच्या ताब्यांत ठेवण्याचा अधिकार नाहींसा होत नाहीं; वादीनें प्रतिवादी सावकाराकडे भाड्याची मागणी केली परंतु सावकारानें त्यास उत्तर दिलें नाहीं, एवढ्यानें मूक संमति गृहीत धरतां येत नाहीं; असा निकाल न्यायमूर्तींनीं दिला व घरमालकास भाडें मिळालें नाहीं.

स्थानिक स्वराज्य संस्थांबाबतच्या कायद्यांत सुधारणा

स्थानिक स्वराज्य संस्थांबाबतच्या कायद्यांत दुरुस्ती करणाऱ्या बिलाचा मसुदा मुंबई सरकारच्या गॅझिटांत प्रसिद्ध झाला आहे. ह्यापुढें स्थानिक स्वराज्य संस्था पूर्णपणें लोकनियुक्त होतील, अशी बिलांत तरतूद आहे. सरकारतर्फे कोणाचीहि नेमणूक होणार नाहीं. हरिजन व मागसलेल्या जाती व जरूर तेथें स्त्रिया व कांहीं अल्पसंख्याक जाती ह्यांस संयुक्त मतदार संघांमार्फत प्रतिनिधित्व दिलें जाईल, म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणांत त्यांस जागा मिळेल. मुसलमानांस संयुक्त मतदार संघांत सामील होण्याची मोकळीक मिळणार आहे.

मुंबई प्रांतांतील कपास कापडाच्या गिरण्या

मुंबई प्रांतांतील कपास कापडाच्या गिरण्यांपैकीं बहुसंख्य गिरण्या मुंबई, अहमदाबाद व सोलापूर येथें केंद्रीभूत झाल्या आहेत. सबंद प्रांतांत मिळून २१० गिरण्या असून त्यांतील कामगारांची संख्या २ लक्ष, ४३½ हजार इतकी भरते. गेल्या दहा वर्षांत ह्या धंद्याची प्रगति कशी झाली हें खालील कोष्टकावरून समजून येईल.—

मुंबई प्रांतांतील कपास कापडाच्या गिरण्या

वर्ष	गिरण्यांची संख्या	चात्यांची संख्या	मागांची संख्या	कामगारांची संख्या	उत्पादनास लागलेली कपास: हंडरवेट	उत्पादनास लागलेली कपास: ३९२ पौंड वजनाच्या गासड्या
	-	ल. ह.	ल. ह.	ल. ह.	ल. ह.	ल. ह.
१९२६–२७	२११	५८ ९३	१ २३	२ ५७	५४ ५०	१५ ५८
१९३०–३१	२१८	६२ ९०	१ ३८	२ ५०	५४ ७०	१५ ६३
१९३६–३७	२१०	६१ ०	१ ४१	२ ४३	५९ १६	१६ ९०

१९२६–२७ सालाच्या मानानें १९३६–३७ मध्यें चात्यांची संख्या वाढलेली नाहीं, तथापि मागांच्या संख्येंत १५·२ टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. कामगारांच्या संख्येंत ५·४ टक्क्यांनीं घट झाली आहे, परंतु कपाशीचा उठाव बराच वाढलेला दिसून येतो.

गेल्या १० वर्षांत मुंबई येथील गिरण्यांच्या संख्येंत बरीच घट झाली आहे. अहमदाबाद येथें मात्र गिरण्यांची संख्या वाढली असून सर्व बाजूंनीं त्यांची प्रगति होत आहे, हें खालील कोष्टकावरून स्पष्ट होईल:—

मुंबई येथील गिरण्या

वर्ष	गिरण्यांची संख्या	चात्यांची संख्या	मागांची संख्या	कामगारांची संख्या	उत्पादनास लागलेली कपास: हंडरवेट	उत्पादनास लागलेली कपास: गासड्या
		लक्ष	हजार	हजार	लक्ष	लक्ष
१९२६–२७	८३	३४½	७५	१,५४	३४¾	१०
१९३०–३१	८१	३४¼	७७	१,२९	२९½	८½
१९३६–३७	६९	२९	६७	१,०९	२९	८¼

मुंबईमधील गिरण्यांची संख्या १४ नें कमी झाली व चात्या, माग, कामगारांची संख्या व कपाशीचा उठाव ह्यांत अनुक्रमें १६·७, १०·५, २९·१ व १६·७ टक्क्यांनीं घट झाली. अहमदाबादमधील गिरण्यांच्या बाबतचे आंकडे ह्या उलट प्रगति दर्शवितात.

अहमदाबाद येथील गिरण्या

वर्ष	गिरण्यांची संख्या	चात्यांची संख्या	मागांची संख्या	कामगारांची संख्या	उत्पादनास लागलेली कपास: हंडरवेट	उत्पादनास लागलेली कपास: गासड्या
		(लक्ष)	हजार	हजार	(लक्ष)	(लक्ष)
१९२६–२७	६६	१४	३१	५६	१०¼	३
१९३०–३१	७६	१५½	४०	७०	१४½	४
१९३६–३७	८१	१९¾	४९	७४	१७¼	५

सबंद हिंदुस्थानांत मिळून ३७० गिरण्या आहेत, त्यांपैकीं २१० मुंबई प्रांतांत असून मुंबई व अहमदाबाद येथें अनुक्रमें ६९ व ८१ आहेत. म्हणजे, एकूण गिरण्यांपैकीं १८·६ टक्के गिरण्या मुंबई शहरांत असून २१·९ टक्के गिरण्या अहमदाबादेंत आहेत.

लोखंड–पोलादाचें वाढतें उत्पादन

अलीकडे, विशेषतः लढाऊ सामानाच्या जोराच्या तयारीमुळें, प्रमुख पाश्चात्य राष्ट्रांतलें लोखंडाचें व पोलादाचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे. खालीं दिलेल्या पोलादाविषयींच्या तुलनात्मक आकड्यांवरून ह्या वाढीची कल्पना येईल:—

पोलादाचें उत्पादन
(लक्ष टन)

	१९३५	१९३६	१९३७
ग्रेटब्रिटन	९८	११७	१२९
अमेरिका	३३४	४६९	४९५
जर्मनी	१६१	१८८	१९५
फ्रान्स	६१	६५	७७
बेल्जम	२९	३१	३८
लक्सेंबर्ग	१८	१९	२४

—कार्यक्रम—
(१) वर्षप्रतिपदेला (चैत्र शुद्ध १) मशिनरीच्या उभारणीला प्रारंभ.
(२) १९३९ च्या जानेवारींत साखर करण्यास प्रारंभ.
दरवर्षी ५॥ टक्के व्याज
व
दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.
सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल:—
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.
२५७ बुधवार पेठ, बेलबागेसमोर,
भिडेवाडा, पुणें २.

अहमदाबाद येथील कपास कापडाच्या गिरण्यांच्या धंद्याचें भवितव्य

अहमदाबाद मिल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. बाळाभाई साकरलाल, हे असोसिएशनच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं, गेल्या आठवड्यांत, आपल्या भाषणांत म्हणाले:—

"गेल्या तीन चार वर्षांच्या मंदीमुळें इतर ठिकाणच्यापेक्षा अहमदाबाद येथील गिरण्यांचे ज्यास्त नुकसान झालें आहे. आतां मंदीची तीव्रता कमी होऊं लागली असून आशाजनक वातावरण निर्माण झालें आहे.

"कपास कापडाच्या गिरण्यांतील कामगारांच्या मजुरींत चौकशी कमिटीनें वाढ सुचविली आहे, ती ज्या अंदाजावर व तत्त्वांवर आधारभूत आहे, त्यांसंबंधीं कमिटीशी एकमत होणें कठीण आहे. कमिटीनें गृहीत धरलेल्या अनेक गोष्टी चुकीच्या आहेत. अहमदाबादेंतील गिरण्यांत पगार कपात एक वर्ष उशीरा करण्यांत आली व कपातीचें प्रमाणहि इतर ठिकाणापेक्षा अल्प ठरविलें गेल. असें असतांनाहि कमिटीनें अहमदाबादेंतील गिरण्यांचा स्वतंत्रपणें विचार केला नाहीं.

"अहमदाबाद येथील गिरण्या आपल्या मालाचा खप वाढविण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत आहेत. गिरणी मालक संघानें पंजाबांत प्रचार करण्यासाठीं एक स्वतंत्र अधिकारी नेमला आहे. परदेशांत माल पाठवून निर्गत व्यापार सुधारण्यास अद्याप बराच वाव आहे.

"मध्यवर्ती असेंब्लीनें ओटावा कराराविरुद्ध मत नोंदल्यानंतर हिंद-ब्रिटन व्यापारी करारांबाबत बोलणीं सुरू झालीं, ती अद्याप पुरीं झालीं नसल्यानें ग्रेटब्रिटनला ओटावा कराराचा फायदा मिळत आहे. हिंदुस्थान सरकार ह्या बाबतींत लवकर तजवीज करील, अशी आशा आहे."

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सची वार्षिक बैठक

इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या फेडरेशनच्या वार्षिक बैठकीस दिल्ली येथें १ एप्रिल रोजीं प्रारंभ होईल. हिंदी संस्थांनांतील विमा कंपन्या विदेशी गणल्या जाऊं नयेत; मालाच्या किंमतीचें मान न पहातां रेल्वे भाडें वाढविण्यांत येऊं नये; देशी लहान धंद्यांबाबतची चौकशी सरकारनें तहकूब करावयास नको होती, कारण, अद्याप जपानी स्पर्धा चालू आहे; इत्यादि अर्थाचे ठराव बैठकींत चर्चिले जातील. व्यापारी व औद्योगिक महत्त्वाच्या इतरहि अनेक प्रश्नांचा विचार होईल.

ग्रेट ब्रिटनचा चहा पिण्यांत पहिला नंबर

ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक मनुष्य (स्त्री, पुरुष व मूल) दरसाल सरासरीनें १,९०० पेले चहा पितो. एक इंग्रज, एक अमेरिकन, एक रशियन, एक जर्मन, एक फ्रेंचमन व एक इटालियन एके ठिकाणीं चहा पिण्यास बसले व आपआपल्या देशांतील चहाच्या खपाचे प्रमाणांत चहा घेण्याचें त्यांनीं ठरविलें, तर इटालियन गृहस्थाच्या प्रत्येक पेल्यास फ्रेंचमनला १८, जर्मनला ६६, रशियनला २७५, अमेरिकनला ४०० व इंग्रजाला २,००० पेले चहा प्यावा लागेल, असें मनोरंजक वर्णन एका अमेरिकन अधिकाऱ्यानें नुकतेंच केलें.

गव्हाचे पोहे

(REGD.) (BLOSSOM) (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषत: लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.



टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

[सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात.]

मो. मु. टिळक

प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[माहितीपत्रक मागवा]

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashiv Peth POONA

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा:—

भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहितीकरितां लिहा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

नाशिक जिल्हा सहकारी वृत्त

शेतकी सोसायट्यांतील शेतकरी कर्जदार सभासदांची स्थिति दिवसेंदिवस खालावत गेल्यानें त्यांना कर्जाची परतफेड करणें अशक्य झालें आहे, इतकेंच नव्हें तर त्यांच्याकडे व्याजाच्याच मोठमोठ्या बाक्या झालेल्या आहेत. त्यामुळें त्यांना विशेष सवलत म्हणून चालू सालीं नाशिक जिल्ह्यांतील सोसायट्यांसाठीं मि. एस. जी. अल्मोला बी. ए., एलएल. बी., असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. मुंबई यांनीं सवलत म्हणून मेंबरांना वसूल व्याजांत व्यक्तिशः सूट देण्याचें सर्क्युलरद्वारें सोसायट्यांना जाहीर केलें आहे. त्याची समज लोकांना समक्ष पटवून देण्यासाठीं ता. २१-२-३८ रोजीं नांदगांव येथें असिस्टंट रजिस्ट्रार यांनीं येऊन सोसायट्यांना भेटी दिल्या व लोकांना व्याजाचे सुटीची समजूत करून दिली. सदर वेळीं मुं. प्रां. को. बँकेचे श्री. एन. यू. पुरोहित, सिनियर इन्स्पेक्टर मालेगांव, श्री. एस. जी. देवधर, सुपरिंटेंडेन्ट ऑफ ब्रँचेस, श्री. व्ही. आर. शिंदे, बी. ए. जी. डी. सी. ए., ऑडिटर मालेगांव इ. मिळून ५० सभासद व यूनिअन कमिटी सभासद हजर होते. सर्वांनीं प्रयत्न करून चालू सालच्या व्यक्तिशः व्याजांत सूट मिळविण्याच्या सवलतीचा फायदा घेण्याचें आश्वासन दिलें आहे.

वरील प्रमाणेंच ता. ९-३-३८ रोजीं येवले येथें तालुका लोकल बोर्ड ऑफिसमध्यें वरील सवलतीची समज देणेसाठी येवले तालुक्यांतील सोसायट्या बोलावून सदर दिवशीं श्री. एन.यू. पुरोहित, सीनियर इन्स्पेक्टर मालेगांव यांनीं सर्वांची समज पटवून दिली व ती लोकांनीं मान्य करून वसुलाचा प्रयत्न करण्याचें आश्वासन दिलें. सदर वेळीं श्री. गुर्जर, इन्स्पेक्टर कोपरगांव, श्री. जोशी, इन्स्पेक्टर नांदगांव, श्री. कोष्टी सुपरवायझर नांदगांव व सोसायट्यांचे ३०-३५ सभासद हजर होते.

डिस्नेच्या कार्टूनची फिल्म

वॉल्ट डिस्नेची सिनेमा कार्टून्स जगप्रसिद्ध झालीं आहेत. त्यानें आतां मामुली फिल्मइतकी लांब एक कार्टून फिल्म तयार केली आहे, तिचें नांव, 'स्नो व्हाइट ॲन्ड दि सेव्हन ड्वार्फस' असें आहे. ही फिल्म एक तास, वीस मिनिटें चालते. ती करण्यास तीन वर्षें लागलीं व पोस्टाच्या तिकिटाच्या आकाराचीं २५ लक्ष चित्रें काढावीं लागलीं. ह्यांपैकीं २½ लक्ष चित्रांचा फिल्ममध्यें उपयोग करण्यांत आला. एकूण फिल्मला ४० लक्ष रु. खर्च आला. फिल्मचें चित्रीकरण रंगीत आहे.

हिंदी कपाशींत सुधारणा—ब्रिटिश कापडाची आयात?

ब्रिटिश कॉटन ग्रोइंग असोसिएशनचे अध्यक्ष, सर विल्यम हिमबरी, हे एका मुलाखतींत म्हणाले:—"सिंध व पंजाब ह्या दोन प्रांतांत कपाशीची लागवड झपाट्यानें वाढत आहे, परंतु पंजाबी शेतकरी सिंधी शेतकऱ्यापेक्षां जास्त चलाख आहे. ह्या प्रांतांतील कपाशीच्या सुधारणेचें श्रेय प्रांतिक शेतकी खात्यांप्रमाणें तेथील युरोपियन जमीनदारांसहि आहे. लँकेशायर दिवसानुदिवस हिंदी कपाशीची खरेदी मोठ्या प्रमाणावर करील, परंतु ब्रिटिश पक्क्या मालाचा उठाव हिंदुस्थानांत झाला पाहिजे. त्यासिवाय हा सौदा टिकणार नाहीं."

ऑंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, ऑंध.

(स्थापना—८ आक्टोबर १९३२)

हेड ऑफिस—ऑंध (सातारा)

शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, विचूद स्टेशन व दिघंची.

चालूं ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जें—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.

न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई

(सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी.)

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—

(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें (२)

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, **पुणें शहर.**

निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

सरकारी कर्जरोखे

५% करमाफ लोन (१९४५-५५)	११८—०
५% (१९३९-४४) लोन	१०४—०
४% १९४३	१०७—८
३½% बिनमुदत	९६-९½
३½% १९४७-५०	१०५—८
२¾% १९४८-५२	१००—०

निमसरकारी रोखे

४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत)	१०९—०
४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत)	१०८—०
४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत)	१०८—०
४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३)	११२—०
५% म्हैसूर कर्ज (१९५५)	१२२—०

मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

बँका

बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११%	१४५—०
बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०%	११५-१२
सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८%	३२—८
इंपीरिअल बँक (५००) १२%	१५६५—०
बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ५%	५८—८
रिझर्व्ह बँक (१००) ३½%	११७-१२

रेल्वेज

दौंड-बारामती (१००) ४½%	१०२—०
पाचोरा-जामनेर (१००) ४½%	९४—०
अहमदाबाद प्रांतज (५००) १२½%	९२२—८
तापी व्हॅली (५००) ७½%	७५०—०

वीज

बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३%	१२०—०
कराची (१००) ९%	२२२—८
पुणें इलेक्ट्रिक (१००) ९%	२१०—०
टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½%	१३६७—८
आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½%	१४५०—०

इतर

बेलापूर शुगर (५०) ७ रु.	१६६—४
इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु.	४४—८
शिंदिया स्टीम (१५) १ रु.	२०-११
न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु.	३९—०
ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ७५ रु. बोनस	४,३५०—०
टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६%	२०५-१०
टाटा आयर्न दु. प्रे. (२००) १५ रु. २ आ.	१७२—०
टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १० रु.	२६१—०
टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु. ३ आ. ६ पै	११७०—०

सोनें-चांदी

सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास	३४—१४
चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास	५१—१५

खेडेगांवांकरितां स्वस्त व टिकाऊ रस्ते—कमिटीची नेमणूक

खेडेगांवांकरितां स्वस्त परंतु टिकाऊ रस्ते कसे करतां येतील, ह्याविषयीं सरकारास सूचना करण्यासाठी मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. गांवांच्या गरजा आणि रस्ते तयार करण्यास लागणारा माल आजूबाजूस उपलब्ध होण्याची शक्यता हीं लक्षांत घेऊन कमिटीनें आपल्या शिफारसी करावयाच्या आहेत. उत्तर विभागाचे सुपरिंटेंडिंग इंजीनियर, मि. तयबजी, हे कमिटीचे अध्यक्ष असून इतर पांच इंजीनियर तिचे सभासद आहेत.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर - मुंबई.
यांचे
ओरिजिनल
ब्राह्मी तेल
मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर
बाळंतकाढा
मुलांकरितां बाळकडू.
कुमारी आसव
नं. १ दहा दिवसांत घेणेचा.
नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.
मुख्य दुकान ठाकुरद्वार शाखा पनवेल व दादर
पुणे एजंट:—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

वन्देमातरम
शिकाकई
साबू
स्टॉकिस्ट : मा. गो. कुलकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

The Only Book Depot of its Kind in India.

Specialising in

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published any where and supply it at publisher's price.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

परोमाक प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

३० एप्रिल १९३८ अखेर होणाऱ्या तृतीय त्रैवार्षिक मूल्यमापनापूर्वीं आपला विमा उतरवून नवीन बोनसमध्यें भागीदार व्हा.

२० व्या शतकांत विमा उतरणें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. एकदां विमा उतरण्याचे ठरल्यावर तो "कॉमनवेल्थ" सारख्या राष्ट्रीय व प्रगतिप्रिय संस्थेंत उतरणें श्रेयस्कर आहे.

अधिक माहितीकरितां लिहा :

दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं. लि०

पुणें २.

शाखाः मुंबई, मद्रास, अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

कि. १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,२६,४०० वसूल झालेलें भांडवल १,१३,०००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ मांवुडां घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुडां, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.